आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ जानेवारी २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त

- सीडॅकने विकसित केलेल्या चीपचं आणि डेव्हलपमेंट बोर्डचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते उद्घाटन

- यंदाच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राज्यातल्या २३ जणांना विशेष आमंत्रण

**आणि**

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पराभूत

**<><><><><>**

गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात पोलीस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक विभागाला यश मिळालं आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. ते आज दिल्लीत अंमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरच्या परिषदेत बोलत होते. अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचं तसंच मानस - दोन या हेल्पलाईन सेवेच्या सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या विस्ताराचं उद्घाटनही अमित शहा यांच्या हस्ते झालं.

ही मोहीम येत्या २५ जानेवारीपर्यंत चालणार आहे. या मोहिमेदरम्यान ८ हजार ६०० कोटी रुपये मूल्य असलेल्या सुमारे एक लाख किलो अंमली पदार्थांची

विल्हेवाट लावली जाणार आहे. गेल्या दहा वर्षांत सुमारे २४ लाख किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आणि ५६ हजार ८०० कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली असल्याची माहितीही शहा यांनी दिली.

दरम्यान, अमित शहा उद्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून ते शनिशिंगणापूर आणि शिर्डीला भेट देणार आहेत. शिर्डीमध्ये होणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनाला ते उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी शिर्डीत दाखल झालेत.

**<><><><><>**

परीक्षा आणि मुलाखती या पारदर्शकपणे घेतल्या जात आहेत हे दिसून आलं पाहिजे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज बंगळुरू इथं राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांच्या २५ व्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले. कुठल्याही प्रकारच्या पक्षपातापासून मुक्त असावा यासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करणं ही देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांची दूरदृष्टी होती, असं धनखड म्हणाले.

नोकरशहा आणि राजकारण्यांकडून आपल्या जोडीदारासाठी उच्च पदं मिळवण्याचा प्रकार चिंताजनक असल्याचं सांगत निवृत्तीनंतरच्या पदनियुक्तीवरही उप राष्ट्रपतींनी चिंता व्यक्त केली. नोकर भरती प्रक्रियेत परिवर्तन घडवून आणण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

सीडॅकने विकसित केलेल्या तेजा जेएएस ६४ या चीपचं आणि नोवा डेव्हलपमेंट बोर्डचं उद्घाटन आज केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते झालं. त्यांनी आज पुण्यातल्या सी-डॅक अर्थात प्रगत

संगणक विकास संस्थेच्या प्रांगणात आयोजित प्रदर्शनाला भेट दिली. सीडॅक मधील सुपर का्ॅम्पुटर तंत्रज्ञान विकासासाठी आणि औद्योगिक कंपन्यांना आवश्यक चीप आणि अन्य तांत्रिक उपकरणांच्या विकासाबाबत सीडॅकमध्ये सुरू असलेल्या कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला.

इलेक्ट्रा्ॅनिक कंपन्यांना आवश्यक असलेल्या इलेक्ट्रॅानिक चीपस् आणि सेमीकंडक्टर विकसित करण्यासाठी रांजणगांव इथं इलेक्ट्रॅानिक क्लस्टरची स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी सहा हजार कोटी रूपयांची तरतूद केल्याचं त्यांनी सांगितलं. तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीने देशात पाच प्रयोगशाळाही विकसित करण्यात येणार असून नॅशनल सुपर कॉम्पुटींग मिशन ही प्रगती पथावर असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, पुणे नाशिक रेल्वेमार्गावर असलेली नारायणगाव इथली जीएमआरटी प्रयोगशाळा अन्य ठिकाणी हलवणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचं विद्यापीठ बनवण्याचा केंद्र सरकारचा मानस असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पुण्यात केलं.  या संस्थेला विद्यापीठाचं बळ मिळालं तर अधिकारांचंही सक्षमीकरण होण्यासाठी मदत होईल, असं त्यांनी म्हटलं.  यावेळी टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेतील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अयोध्येतल्या रामलल्ला अभिषेकाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी हे दिव्य आणि भव्य राम मंदिर प्रेरणादायी ठरेल,

असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केला. अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून विशेष कार्यक्रम होत आहेत. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादन आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकाचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

सोमवारपासून सुरू होणाऱ्या प्रयागराज महाकुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून विविध वैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. मेळ्याच्या ठिकाणी ५ हजार ओपीडी उघडण्यात आल्या असून, यात रोज दहा हजार लोकांना तपासलं जाईल. तसंच तीन लाखापर्यंत चष्म्यांचं वाटप केलं जाणार असून नेत्रदान शिबीरही आयोजित करण्यात येणार आहे. परेड मैदानावरल्या सेंट्रल हॉस्पीटलमध्ये शंभर खाटांची व्यवस्था केली आहे. इथं ओपीडीपासून आयसीयूपर्यंत सर्व सुविधा असतील. अरैल इथले सब सेंट्रल हॉस्पीटल, प्रयागराज जंक्शन, नैनी आणि सुबेदारगंज इथल्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय निरीक्षण कक्ष उभारण्यात आले आहेत. देशभरातले २४० डॉक्टर महाकुंभमध्ये वैद्यकीय सेवा देणार आहेत.

<><><><><>

हज यात्रा २०२५ साठी विविध राज्यांतल्या तीन हजार सहाशे ७६ अर्जदारांना तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दिली आहे. भारतीय हज समितीनं आज या वर्षीच्या हजसाठी दुसरी प्रतीक्षा यादी जाहीर केली. या अर्जदारांनी या महिन्याच्या २३ तारखेपूर्वी दोन लाख ७२ हजार ३०० रुपये जमा करणे आवश्यक आहे, अशी सुचना अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयानं केली आहे. तसंच अर्जदारांना यासंदर्भात आवश्यक कागदपत्रं सादर करायला सांगितलं आहे. या वर्षी भारतीय हज समिती द्वारे एक लाख बावीस हजार यात्रेकरूंना पाठवलं जाणार आहे.

<><><><><>

या वर्षी २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली इथं कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाचा साक्षीदार होण्यासाठी देशभरातून १० हजार विशेष पाहुणे आमंत्रित करण्यात आले आहेत. या विशेष निमंत्रितांमध्ये मुंबईतल्या पाच जणांचा समावेश आहे. त्यात अँटॉप हिल इथले अतुल जाधव आणि वसई इथले वैभव नितीन पाटील यांना प्रधानमंत्री यशस्वी योजनेच्या श्रेणीत आमंत्रित केलं आहे. कलाकार निवास विभागात शिल्पगुरू आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त ब्रह्मदेव पंडित, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त अभय ब्रह्मदेव पंडित यांची निवड करण्यात आली आहे. हस्तकला श्रेणीत महाराष्ट्र टेक्सटाईल कार्पोरेशनच्या सहाय्यक आयुक्त उज्वला सदाशिवराव पाटील यांना आमंत्रित केलं आहे. महाराष्ट्रातून एकूण २३ विशेष पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलं आहे.

<><><><><>

आसामच्या दिमा हसाओ जिल्ह्यातल्या कोळसा खाण दुर्घटनेतील बचाव कार्य आजही सुरू होतं. आज सुमारे दीडशे तासांच्या प्रयत्नांनंतर तीन

खाणकामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. सोमवारी सकाळी या कोळसा खाणीत अचानक पाणी शिरल्याने कामगार अडकले होते. दरम्यान, या अपघाताप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

<><><><><>

पाकिस्तानातल्या बलुचिस्तान प्रांतातल्या एका कोळसा खाणीत मिथेन गॅसचा स्फोट होऊन चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर आठ कामगार बेपत्ता आहेत. गुरुवारी रात्री हा स्फोट झाला होता.

<><><><><>

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताच्या सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला दक्षिण कोरियाच्या सेओ संग-जे आणि किम वोन-हो यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. कोरियन जोडीनं त्यांचा १०-२१, १५-२१ असा पराभव केला.

तत्पूर्वी, उपांत्यपूर्व फेरीत, भारतीय जोडीनं मलेशियाच्या येव सिन ओंग आणि ई यी तेओ यांच्यावर २६-२४ आणि २१-१५ असा विजय मिळवला.

<><><><><>

इंडियन सुपर लीग फुटबॉलमध्ये बंगळुरू इथं झालेल्या सामन्यात मोहम्मदन SC ने बंगळुरू एफसी संघाचा १- ० ने पराभव केला. मिरजालोल कूसिमोव्हने ८८ व्या मिनिटाला गोल डागला. मोहम्मदनच्या फ्लोरंट ओगियरला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. आजचा दुसरा सामना मोहन बागान आणि पूर्व बंगाल यांच्यात गुवाहाटी इथं सुरू आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेला उद्यापासून मेलबर्नमध्ये सुरुवात होणार आहे. यानिक सिनर, नोवाक जोकोविच, अलेक्झांडर झ्वेरेव, कार्लोस अल्काराज, ॲरीना साबालेंका, इगा श्वियांतेक यासारखे बडे खेळाडू विजेतेपदासाठी लढत देतील. रोहन बोपन्ना, युकी भांब्री, श्रीराम बालाजी आणि रित्विक बोल्लीपल्ली हे भारतीय खेळाडू यात सहभागी होत आहेत.

**//<><><><><>//**